सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.**

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

**पत्र पेटी क्रमांक** 507, **पीर बाजार रोड** , उस्मानपुरा, औरंगाबाद-431 005

दूरध्वनी क्र. (0240)**2353644 (P)**, 2334724 (O), भ्रमणध्वनी **विद्यार्थी विभाग** 9420452101

website: www.gpabad.ac.in

E-mail: : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

office.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

||PURSUIT FOR EXCELLENCE||

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**विद्यार्थ्यांना सूचना :**

NO.GPA/EC/222/2023/ 227 Date : 30/06/2023

**विषय — उत्तरपत्रिका गुणपडताळणी व पुनर्मुल्यांकनासाठीचे वेळापत्रक व पध्दत.**

(Schedule for Recounting, Photocopy & Reassessment of Answer Books)

**उन्हाळी** परीक्षा 2022-2023 लेखी परीक्षा दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रति **(PhotoCopy)** पडताळून त्यांच्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन **(Reassessment)** करावयाचे आहे, अशा विद्यार्थ्यांनी संस्थेच्या **www.gpabad.org.in** संकेतस्थळावर जावून स्वत:च्या **Login** मधून **Form Submission** या **Tab** वर जावून **Recounting / Photocopy / Reassessment** चे विषय निवडून त्याप्रमाणे त्याच लिंकमधून फिस ऑनलाईन पध्दतीने या संकेतस्थळावर भरावयाची आहे. सदरील फॉर्मची प्रिंट काढून स्वत:कडे सांभाळून ठेवावी. जो पर्यंत आपल्या लॉगिनमध्ये आपणास भरलेली फीस **Receipt** दिसणार नाही. तोपर्यंत आपला फॉर्म **Submit** झाला / आपले **Payment Submit** झाले असे म्हणता येणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

शुल्क भरल्याचा डेटा बँकेकडून अधिकृतरीत्या **Download** करून प्राप्त माहितीवरच विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी व पुनर्मुल्यांकन करण्यात येईल. चुकीचे **Course Code, Amount, Enrollment No.** अथवा चुकीची माहिती भरल्यास सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांचीच राहील व त्या परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शुल्क परत अथवा वळते केले जाणार नाहीत. ऑनलाईन रक्कम जमा केल्याची पावती विद्यार्थ्याने स्वत:च्या जवळच ठेवावी. काही त्रृटी असल्यास तसेच गरज पडल्यास पावतीची झेरॉक्स सादर करणे अत्यावश्यक आहे.

खालील वेळापत्रकाप्रमाणे त्यांच्या उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी व पुनर्मुल्यांकन करण्यात येईल, याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. **विद्यार्थ्यांनी वेळेत शुल्क भरावेत. विहीत तारखेनंतर शुल्क भरता येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

| अ क्र | कार्य तपशील | कालावधी |
|---|---|---|
| 01 | उत्तरपत्रिकांच्या पुनर्गुणपडताळणी **(Recounting)** रू. 100/- प्रति विषयाप्रमाणे, उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी **(Photocopy of Answer Book) ONLINE** पध्दतीने भरावयाचे शुल्क रू. 300/- प्रति विषयाप्रमाणे. | दि. 01/07/2023 ते दि. 05/07/2023 |
| 02 | **ONLINE** पध्दतीने पैसे भरल्याची पावती दाखवून स्थानिक मूल्यांकन **(LAC)** केंद्रामधून उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत **(Photocopy of Answer Book)** हस्तगत करणे. | दि. 10/07/2023 ते दि. 12/07/2023 |

| अ क्र | कार्य तपशील | कालावधी |
|---|---|---|
| 03 | **Reassessment** शुल्क रू. 500/- प्रति विषयांप्रमाणे पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज सादर करणे. ज्या विद्यार्थ्यांनी फोटोकॉफी घेतली असेल तेच विद्यार्थी **Reassessment** साठी अर्ज करण्यास पात्र राहतील. त्यामुळे **फोटोकॉपी न घेतलेल्या विद्यार्थ्यांनी** Reassessment **साठी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यांचे शुल्क ही परत मिळणार नाही याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.** | दि. 10/07/2023 ते दि. 13/07/2023 |
| 04 | उत्तरपत्रिकांच्या पुनर्गुणपडताळणी **(Recounting)**, पुनर्मुल्यांकनाचा **(Reassessment)** निकाल जाहीर करणे. | दि. 20/07/2023 |
| 05 | गुणात/निकालात बदल झाल्यामुळे विषय नोंदणीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची विषय नोंदणी (शुल्कासह) | दि. 25/07/2023 |

सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**(डॉ. ए. एम. जिंतूरकर)**
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.

**प्रत-** सर्व विभागप्रमुख - स्थापत्य/यंत्र/स्वयंचल/विद्युत/अणुविद्युत/माहिती तंत्रज्ञान/संगणक/AN/डी.डी.जी.एम./ विज्ञान/ उपयोजितयंत्रशास्त्र /कर्मशाळा ग्रंथालय/वसतिगृह /प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी/ विद्यार्थी विभाग (कार्यालय).